# प्रकरण चार

## लघुपाटबंधारे विभाग

**4.230 जलपुर्ती धडक सिंचन विहीरीची लाभार्थी पात्र नसतांना त्यांना अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 9,30,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2015-16 या वर्षाचे लेखापरिक्षण करतांना मंजुर यादीत नमुद विहीरी 93 रद्द केलेल्या कारणाची शहानिशा न करता त्यांना प्रथम हप्ता वितरीत करुन शासनाचे विनाकारण शासकीय अनुदान गुंतवूण ठेवल्याचे दिसुन येते. त्यामुळे लाभार्थी पात्र नसतांना त्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले तरी सदर बाबतीत कराराच्या अटी व शर्तीनुसार संबंधीत लाभार्थीकडुन प्रथम हप्ता रुपये 10,000/- प्रमाणे वसुल पात्र ठरते. करिता सदर रक्कम वसुल करुन दर्शवावी.

**4.231 धडक सिंचन विहीर योजना पुर्ण / अपुर्ण बांधकामाबाबत. (अभिकरण निधी)**

**पंचायत समिती वाशिम, जिल्हा वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 50,18,411/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक योजना 2013/प्र.क्र.123/रोहयो-5, दिनांक 23/01/2014 अन्वये विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयामध्ये धडक सिंचन विहीर योजना राबविण्यात आली ठरवुन दिलेल्या लक्षांकानुसार विभागाकडुन प्राप्त माहितीनुसार सदर योजनेवरील अपुर्ण विहिरी पुर्ण करण्याबाबत दिनांक 30/06/2016 पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु विवरणपत्र 6 ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे अदयापर्यत 57 विहिरी अपुर्ण असल्याचे दिसुन येते.

2) उपरोक्त शासन निर्णयान्वये रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहिर / धडक सिंचन विहिर कार्यक्रमातंर्गत ज्या विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली व लाभार्थ्यांना अग्रिम देण्यात आले. परंतु ज्या लाभार्थ्यांनी अदयापर्यत विहिरीचे कामे सुरु केली नाहीत. अशा लाभार्थ्याच्या विहिरी रद्द करण्यात याव्यात व त्याच्याकडुन अग्रीमाची रक्कम वसुल करण्यात यावी. परंतु विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याचे दिसुन येते.

3) अग्रिम देवुन सन 2015-2016 पर्यत विहिरीचे कामे पुर्ण न झालेली व अंशत: प्रगतीपथावर असलेली बांधकामे यावर एकुण रुपये 3,20,000/- निधी गुंतून पडलेला आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही करुन प्रगतीपथावर असलेली बांधकामे पुर्ण करुन दर्शवावी. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता नियम 1968 मधील 190 अन्वये नमुना 65 मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन दर्शवावे. अग्रिम देवुनही सुरु न करण्यात आलेली बांधकामाची अग्रिम वसुली करुन शासनखाती जमा करण्यात यावी.

4) पंचायत समिती स्तरावरुन खालील विभागांना धडक सिंचन विहिर योजनेअंतर्गत लघुसिंचन (जलसंधारण) उपविभाग, वाशिम यांना रुपये 4,17,071/- व सहाय्यक अभियंता, लघुपाटबंधारे, उपविभाग-3, वाशिम यांना रुपये 4,63,886/- असे अनुदान वाटप करण्यात आले आहे. परंतु या खर्चाचे संपुर्ण अभिलेखे वारंवार मागणी करुन तसेच अर्धसमासपत्र क्रमांक 21, दिनांक 26/08/2016 व अर्धसमासपत्र क्रमांक 22, दिनांक 31/08/2016 अन्वये मागणी करुन सुध्दा सदरचे संपुर्ण अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 व 5 नुसार लेखापरीक्षेसाठी संपुर्ण लेखे सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकारणांची असुन सादर करण्यात आले नाही. तरी याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 11, दिनांक 22/08/2016, अर्धसमासपत्र क्रमांक 21, दिनांक 23/08/2016 व अर्धसमासपत्र क्रमांक 14, दिनांक 24/08/2016 अनव्ये मागणी करुन सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे कलम 7 अन्वये दंडास पात्र असल्याचे दिसुन येते.

5) प्रशासकीय मंजुरीचे अटी व शर्तीनुसार लाभार्थ्याचे विहिरीवर कर्ज नसल्याबाबतचे भूविकास बॅंकेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. तसेच उपविभाग बांधकाम व बांधकाम (पंचायत) अंतर्गत पुर्ण / अपुर्ण विहिरीचे बांधकामे 2.5 लक्ष मधुन सुधारीत मंजुरी आदेशानुसार करण्यात आले. परंतु अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे जसे नमुना 7/12, खाते उतारा (नमुना 8अ), फेरफार नक्कल, करारनामा, तलाठी विहिर नसल्याबाबतचा दाखला, कुटूंब शासकीय नोकरीवर नसल्याचा दाखला, रहिवासी दाखला इत्यादी कागदपत्रे जुनीच आढळुन आली आहेत.

6) श्री. भगवान दाजिबा गोटे, रा.खडसिंग यांना रुपये 90,464/- रक्कम प्रदान करण्यात आली. परंतु सदर बांधकामाचे मुल्यांकन नोंदवही तपासणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदर खर्चाची पडताळणी करता आली नाही.

7) विहिर बांधकाम पुर्ण झाले व शेतीकामास विहिरीव्दारे सिंचन कामास उपयोग करण्यात येत असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीस उपलब्ध झाले नाही.

**4.232 जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत शेतक-यांना शेततळे लाभ योजनेतील गंभीर अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कुही, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** जलयुक्त शिवार अभियान योजनेअंतर्गत शेतक-यांना प्रती शेततळी रुपये 1,00,000/- च्या मर्यादेत एकुण 1 ते 31 शेततळयांचा लाभ देण्याबाबत व इतर खर्चाबाबत एकुण रक्कम रुपये 36,79,687/- खर्च नोंदविलेला आहे. यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) प्रमाणक क्रमाक 1450, दिनांक 30/03/2016 अन्वये रुपये 4,95,930/- सचिव, ग्रामपंचायत वडेगाव काळे यांना लाभार्थी नारायण सुंदरकर, अंबादास कुल्लुरकर, भारत शेंद्रे, शंकर काळे व समीर काळे यांना देय असलेल्या रकमेचे प्रदान केलेले आहे. परंतु उपरोक्त प्रमाणक क्रमांक 1430 ते 1434 अन्वये देखील उपरोक्त 5 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आल्याचे दिसुन येते. करीता प्रमाणक क्रमांक 1450 अन्वये प्रदान केलेली रक्कम रुपये 4,95,930/- ही सदर लाभार्थी दोबारा दर्शवुन तसेच संबंधीत लाभार्थ्यांना प्रत्यक्षात प्रदान न करता ग्रामपंचायत सचिवास प्रदान करण्याचे प्रयोजन काय ? तसेच प्रमाणक क्रमांक 1430 ते 1434 अन्वये प्रदान एकुण रक्कम रुपये 4,95,930/- प्राप्तीबाबत संबंधीत लाभार्थ्यांच्या स्वाक्ष-या नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 मधील नियम क्र. 20 व 21 मध्ये निर्देशित केल्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) प्रमाणक क्रमांक 1633 ते 1637 अन्वये लाभ देण्यात आलेल्या शेततळयांचे काम पुर्णत्व प्रमाणपत्र, नमुना 46 मोजमाप मुल्यांकनानुसार सदर शेततळयांना प्रशासकीय मंजुरी माहे मे, 2016 मध्ये तसेच तांत्रिक मंजुरी नोंदवहीची तपासणी केली असता नारायण चंदनखेडे, यशोदा मानकर, धनराज घोडमारे किशोरकांत सोनी व भानुदास बोरकर यांचे शेततळयांना तांत्रिक मंजुरी दिनांक 06/05/2016 रोजी देण्यात आलेली आहे. परंतु उपरोक्त प्रमाणकांन्वये अनुदान रक्कम रुपये 5,00,000/- दिनांक 31/03/2016 रोजी खर्ची घातलेली आहे. यावरुन सदर शेततळयांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी प्राप्त् नसतांना अनुदान रुपये 5,00,000/- नियमबाहय खर्ची घातलेले आहे.

3) जलयुक्त शिवार अभियान योजनेअंतर्गत उपरोक्त प्रमाणकांन्वये एकुण रक्कम रुपये 36,79,687/- खर्च झाल्याचे दिसुन येते. परंतु सदर लेखाशिर्षांतर्गत नमुना 14 मध्ये एकुण रुपये 36,65,607/- व वार्षिक लेखे सन 2015-2016 मध्ये 35,15,706/- दर्शविण्यात आलेले आहेत. रुपये 36,79,687-35,15,706=1,63,981/- ने कमी नोंदविल्याने सदर लेखाशिर्षांतर्गत वार्षिक लेख्यातील लेखांकन अचुक असल्याचे म्हणता येत नाही.

4) उपरोक्त प्रमाणकांन्वये कपात केलेली एकुण रॉयल्टी रक्कम रुपये 13,981/- संबंधितांकडे भरणा केलेली नाही. प्रमाणक क्रमांक 1588, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 950/- रॉयल्टी खर्च नोंदवुन योजना निधीची शिल्लक कमी केली आहे. सदर रॉयल्टी प्रमाणक क्रमांक 1586 व 1587 ची रुपये 452+498=950/- असल्याचे दर्शविलेले आहे. सदर रक्कम उपरोक्त प्रमाणकांची रॉयल्टी कपात असुन सदर प्रमाणकां व्यतिरीक्त नियमबाहय जादा खर्च नोंदविलेला आहे.

5) प्रमाणक क्रमांक 1586 व 1587, दिनांक 30/03/2016 व 1601, दिनांक 31/03/2016 चे काम पुर्णत्व दिनांक 25/05/2016 असुन सदर शेततळयांचे प्रदान उपरोक्त प्रमाणकांन्वये माहे मार्च, 2016 (सन 2015-2016) मध्येच म्हणजेच काम पुर्ण होणाच्या दिनांकापुर्वीच नियमबाहय खर्च नोंदविलेला आहे.

6) सदर अभियान योजनेअंतर्गत पुर्ण केलेल्या शेततळयांना काम पुर्णत्व प्रमाणपत्र महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 मध्ये विहीत नमुन्यातील नमुना 65 मध्ये देण्यात आलेले नाही. तसेच प्रमाणक क्रमांक 1439, 1440, 1442, 1489 1490, 1492 व 1493, दिनांक 31/03/2016 अन्वये प्रदान केलेल्या शेततळयांच्या काम पुर्णत्व प्रमाणपत्रावर दिनांक नमुद केलेले नाही. काम पुर्ण झाल्याची खात्री न करताच नियमबाहय प्रदान केलेले आहे.

7) प्रमाणक क्रमांक 1439, 1440, 1494, 1495, 1496 दिनांक 30/03/2016 व प्रमाणक क्रमांक 1601, 1634, 1636, 1637 दिनांक 31/03/2016 अन्वये प्रदान केलेल्या शेततळयांचे मंजुर प्रस्ताव नस्ती लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

**4.233 तलाव लिलावाची वसुली बाबत.**

**पंचायत समिती सावली, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती सावली येथील सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणास तलावाचे विवरणपत्राची तपासणी केली असता माहे मार्च 2016 अखेर मच्छीमार / मालगुजारी / सिंचाई तलावाचे लिलावापासुन रक्कमेची एकुण मागणी रक्कम रुपये 3,56,136/- एकुण वसुली झालेली रक्कम रुपये 1,27,602/- व एकुण थकित असलेली रक्कम रुपये 2,28,534/- हि वसुली अभावी प्रलंबित आहे. त्यामुळे प्रलंबित असलेली रक्कम रुपये 2,28,534/- याबाबत प्राधन्याने वसुलीची योग्य कार्यवाही करण्यात यावी.

**4.234 पंचायत समिती उपकरातंर्गत नाला सरळीकरण / पाणीपुरवठा कामातील आयकराची रक्कम कपात न करणे / कामातील नियमबाहयता बाबत.**

**पंचायत समिती लातूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रूपये 33,40,841/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ZPA-2000/33/34, दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेणा-या अभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

2) करारनाम्यावर दोन जामीनदाराच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. परंतु स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना नं.69 व नियम 97 अन्वये नमुना नंबर 40 मध्ये रस्त्याची नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि नोंदी घेतल्याची खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार अंतिम मोजमाप घेवुन रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमापावर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहीजे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

5) ग्रामपंचायतीस रक्कम प्राप्त झाल्याबाबत नमुना नंबर 7 ची सामान्य पावती घेण्यात आलेली नाही.

6) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार कंत्राटदाराच्या देयकातुन आयकराची रक्कम 2.3 टक्के दराने कपात करने आवश्यक असतांना कपात करण्यात आली नाही. एकूण रक्कम रुपये 73,503/- एवढी संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती चलनाने भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समितीलेखासंहिता 1968 चे नियम 147 नुसार कंत्राटदारासोबत केलेल्या प्रत्येक कराराची नोंद नमुना नं.48 मध्ये नोंदविण्यात येईल. परंतु नमुना नं.48 ची नोंदवही ठेवण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र बांधकाम नियमावली 296 (2) नुसार माहे फेब्रुवारी व मार्च महिन्यात कार्यरंभ आदेश निर्गमीत करण्यात प्रतिबंध आहेत. असे असतांना उपरोक्त तपशिलाचे कामास कामाचे आदेश देण्यात आले आहेत. सदर नियमबाहयतेबाबत खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.